# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत**
**(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं. ८३२ ए, शिवाजीनगर पुणे ४११००४**
दूरध्वनी क्र.:-०२०- २९७०९६१७ वेबसाइड:-**mscepune.in** ई-मेल :-mscepune@gmail.com

**दरपत्रक सूचना**

जा.क्र./मरापप/भांडार/संकीर्ण/द.सू./2025/ 203
दिनांक : 15 / 01 /2025

प्रति,

------------------------------
------------------------------
------------------------------

**विषय** - महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या भांबुर्डा शिवाजीनगर, पुणे - 04 येथील मा.उपायुक्त,सहा.आयुक्त व प्रोग्रामर यांचे कक्षाचे पार्टीशन बंदीस्त करणेसंबंधी दरपत्रके मागविणेबाबत..

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या पुणे - 04 राज्य मंडळ कार्यालय, चौथा मजला याठिकाणी मा.उपायुक्त दोन कक्ष, मा. सहा.आयुक्त दोन कक्ष व प्रोग्रामर यांचे कक्ष आहेत. सदर ठिकाणचे कक्ष एकमेकांना चिकटून असल्याने संवादामुळे ध्वनीप्रदुषणाचा अधिकारी वर्गास त्रास होत आहे. त्यामुळे सदर कक्ष बंदिस्त करावयाचे आहेत. प्रोग्रामर कक्षामध्ये गोपनीय कामकाज होत असल्याने, तेथील कक्ष बंदिस्त करावयाचे आहेत. तसेच मा. अध्यक्ष यांचे दालनाचा दरवाजा आपटत असल्याने तेथील स्टॉपरचे काम करुन घ्यावयाचे आहे.

सदर काम करणाऱ्या इच्छूक दराकारांनी कामाची प्रत्यक्ष पहाणी करुन, मोजमाप व साहित्य यांचे वर्णन देऊन दरपत्रके "**आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे**." यांचे नावे दिनांक : 15 /01/2025 पासून दिनांक : 21 /01/2025 दुपारी 3.00 पर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, यांचे उक्त नमूद पत्त्यावर हस्तपोच आणून द्यावीत. तांत्रिक कागदपत्रे लिफाफा व दरपत्रक लिफाफा वेगवेगळे देणे आवश्यक राहिल. बंद लिफाफा वरील भागावर "**ॲल्युमिनियम पार्टीशन**" साठी दरपत्रक किंवा तांत्रिक कागदपत्रे, असे स्पष्ट नमूद करावे. उशिरा आलेली किंवा ई-मेलवर पाठविण्यात आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही, दरपत्रके उघडणे,संस्था नियुक्त करणे वा तांत्रिक कारणास्तव दरपत्रके रद्द करण्याचे अधिकार मा. अध्यक्ष यांना राहतील याची नोंद घ्यावी.

**दरपत्रकासोबत तांत्रिक कागदपत्रे खालीलप्रमाणे द्यावीत**.

| |
|---|
| 1.सेवा पुरवण्याबाबत संबंधित विभागाकडून सक्षम अधिकारी यांनी दिलेला परवाना. |
| 2.वस्तु व सेवा कर प्रमाणपत्र. |
| 3.संबंधित संस्था चालकाचे आधार व पॅन. |
| 4.मागील वर्षाचे ITR. |

(अनुराधा ओक)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे-04